मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# दिवाळीनंतर दोन दिवसात आचारसंहिता!

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील : इच्छुक उमेदवारांना दिला कानमंत्र

**पुणे | प्रतिनीधी**

आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचा "विजयी संकल्प मेळावा" आज मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्यात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी कार्यकर्त्यांना आगामी निवडणुकीसाठी सज्ज होण्याचा सल्ला देत महत्त्वाचे राजकीय संकेत दिले.

“निवडणूक ही फास्ट ट्रेनसारखी असते, प्लॅटफॉर्मवर राहिलात तर ती निघून जाईल. नाराज होऊ नका, प्रयत्नांबरोबर नशीबही लागते,” असे सांगून त्यांनी कार्यकर्त्यांना जोमाने तयारीला लागण्याचा कानमंत्र दिला.

### ZP निवडणुकीची घोषणा लवकरच?

चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट संकेत दिले की, "आज संध्याकाळपर्यंत जिल्हा परिषद निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे." त्यांनी पुढे सांगितले की, "मी ४० वर्षे निवडणुका पाहिल्या आहेत, त्यामुळे निवडणूक आयोगाशी चर्चा झाली, असे समजायचे कारण नाही — हा फक्त अनुभवावर आधारित अंदाज आहे." त्यांनी सूचकपणे म्हटले की, "दिवाळीनंतर दोन दिवसांत आचारसंहिता लागेल, त्यामुळे आतापासून तयारीला लागा."

### "महायुती म्हणून लढायचं, पण कार्यकर्त्यांवर अन्याय नाही"

पाटील यांनी मेळाव्यात स्पष्ट केले की, "निवडणूक महायुती म्हणून लढवायची आहे. मात्र, जर राष्ट्रवादी काँग्रेस किंवा शिवसेना एखादं ठिकाण मागत असेल आणि तिथे भाजपचा चांगला उमेदवार



असेल, तर 'मैत्रीत लढणार' पण कार्यकर्त्यांचा बळी देणार नाही." ते पुढे म्हणाले, "वरिष्ठ नेते शेवटचा निर्णय घेतील, पण कोणत्याही भाजप कार्यकर्त्यावर अन्याय होऊ देणार नाही."

चंद्रकांत पाटील यांनी २०१९ साली शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेवरही टीका केली. "उद्धव ठाकरे यांनी थोडी समजूत दाखवली असती, तर आज शिवसेनेला काँग्रेस-राष्ट्रवादीच्या वाटेला जावं लागलं नसतं," असा टोला त्यांनी लगावला. "२०१९ साली सरकार जाणं ही नियती होती. पण उद्धव ठाकरेंनी 'उतू नको मातू नको, घेतला वसा सोडू नको' अशी भूमिका घेतली — आणि त्यातून काय मिळालं?", असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

### भाजप कार्यकर्त्यांना आदेश, नव्हे प्रेरणा..

» चंद्रकांत पाटील यांनी स्वतःच्या भूमिकेचे उदाहरण देत सांगितले की, "मी कधीच कोणतेही तिकीट मागितले नाही. नेत्याची इच्छा म्हणजे कार्यकर्त्यांसाठी आज्ञा असते." ते म्हणाले की, "२०१९ मध्ये ज्यांना तिकीट नाकारले गेले, त्या बावनकुळे यांना आता २०२४ च्या विधानसभा निवडणुकीचे उमेदवार ठरवण्याचे अधिकार दिले गेले आहेत. त्यामुळे राजकारणात संधीसुद्धा मिळते – फक्त संयम आणि कार्य आवश्यक आहे."

### 2024 जिंकण्यासाठी दिवाळीचा वापर करा..

» पाटील यांनी कार्यकर्त्यांना आठवण करून दिली की, "२०१७ मधील परिस्थिती बदलायची असेल, तर या दिवाळीतच मतदारांशी संपर्क वाढवा. लोकांमध्ये मिसळा, त्यांचे प्रश्न समजून घ्या. कारण २०२४चा पाया हीच ZP निवडणूक ठरू शकते." चंद्रकांत पाटील यांच्या भाषणातून स्पष्ट संकेत मिळतात की जिल्हा परिषद निवडणुका आता फार लांब नाहीत. त्यांनी कार्यकर्त्यांना स्पष्ट संदेश दिला आहे — "राजकारणात संयम, मेहनत आणि वेळेवर तयारी या गोष्टींवरच यश अवलंबून असते."

---

# तळवडे ते त्रिवेणीनगरचौकातील वाहतूक कोंडी हटेना

## सततच्या या वाहतूक कोंडींमुळे नोकरदार, विद्यार्थी अन् वाहनचालक त्रस्त

**पिंपरी | प्रतिनीधी**

तळवडे केनबे चौक ते त्रिवेणीनगर चौकादरम्यान वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे.सततच्या या वाहतूक कोंडींमुळे वाहनचालक हैराण झाले आहेत. येथील रस्त्याचे रूंदीकरण अन् वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

निगडी-तळवडे या मार्गावरून शहरात येण्यासह तळवडेतील आयटी पार्क, चाकण एमआयडीसी तसेच देहू-आळंदीला जाण्यासाठी हा मुख्य मार्ग आहे. या मार्गावर गावठाण, मंदिर यासह अनेक कंपन्या असल्याने या मार्गावर सतत वर्दळ असते. वाहनांची संख्याही अधिक असते. सकाळ आणि संध्याकाळच्या वेळी वाहतूक कोंडीनी परिसर पॅक झालेला असतो. अरूंद रस्ता अन् वाहतूकीची वर्दळ जास्त असल्याने हा मार्ग सकाळ ते संध्याकाळी कोंडीने पॅक झालेला असतो.

वाहतुकीसाठी निगडी ते तळवडे चार पदरी रस्ता आहे. मात्र, नेमका पुढील वळणावर हा रस्ता निमुळता अन् दोनच पदरी होतो. अचानक दोन लेन कमी झाल्याने या पॉइंटवर वाहनांची कोंडी होते. याच भागात लगतच्या दोन्ही बाजूने दोन छोटे रस्ते येतात. ही वाहनेही याच पॉइंटवर रस्त्यावर येतात. यामुळे कोंडीत आणखीनच भर पडते.

सायंकाळी आयटी पार्क सुटल्यानंतर तर तळवडेकडून निगडीच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर वाहनांच्या दूरपर्यंत रांगा लागतात. अनेक वाहने या कोंडीत अडकून पडतात. वाहतूक नियमनासाठी पोलिसांची नेमणूक केली जाते. मात्र, अरुंद रस्त्यामुळे वाहतूक सुरळीत करताना पोलिसांचीही अक्षरशः दमछाक होते. तरी येथील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी येथील रस्त्याचे रुंदीकरण करून आणखी योग्य त्या उपाययोजना राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.



“ तळवडे कॅनबे चौक ते त्रिवेणीनगर चौकापर्यंत नित्याची वाहतूक कोंडी असते. सकाळ- सायंकाळच्या वेळी अर्धा ते एक तास कोंडीत अडकून पडावे लागते. सकाळी मुलांना शाळेत जाण्यासाठी तसेच कंपनीतील कर्मचारी, आयटी कर्मचाऱ्यांना वेळेत पोहचण्यासाठी उशिर होतो. अनेक कर्मचाऱ्यांचा कोंडीमुळे लेटमार्क होतो.

**- शरद वसंत भालेकर, स्थानिक.**

“ निगडी ते तळवडे रूंद रस्ता आहे. पुढे हा रस्ता अरूंद होत गेला असल्याने वाहतूक कोंडीवर ताण येतो. दरम्यान, या चौकात वाहतूक सुरुळीत राहण्यासाठी सातत्याने वाहतूक पोलिसांची नेमणूक केलेली असते. मात्र रस्त्याचे रूंदीकरण आवश्यक आहे, कारण या ठिकाणी वाहतूकीची वर्दळ जास्त आहे.

**- दत्तात्रय चासकर, वरीष्ठ पोलिस निरीक्षक तळवडे वाहतूक विभाग.**

“ कॅनबे चौकात आमचा व्यवसाय आहे. यमुनानगरवरून मला कॅनबे चौकात जाण्यासाठी खूप वेळ जातो. वाहतूक कोंडीमुळे पंधरा मिनिंटमध्ये पोहचण्याऐवजी दीड तास लेट होतो. रस्त्याचे रूंदीकरण केल्यास नक्कीच कोंडी कमी होण्यास मदत होईल. तळवडे आयटीपार्क, एमआयडीसी कंपन्या यामुळे वाहतूक मोठ्या प्रमाणात आहे. लवकर रस्त्याचे रूंदीकरण करावे.

**- प्रतिभा साखरे**

# महावितरणच्या मोशी शाखा विभाजनाला "हिरवा कंदिल"

## आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश; समाविष्ट गावांतील शाश्वत विकासावर शिक्कामोर्तब

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदारसंघातील महावितरण संदर्भात विविध प्रलंबित विकास कामांसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळाने (महावितरण) महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मोशी उपशाखेचे विभाजन करण्याच्या प्रस्तावाला मान्यता मिळाली आहे.

भोसरी आणि परिसरातील वीज पुरवठा सक्षम करण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. महावितरणचे संचालक विश्वास पाठक यांच्यासोबत मे-2025 मध्ये महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली होती. त्यानंतर विधानसभा अधिवेशनातही भाजपा महायुती सरकारचे लक्ष वेधले होते. त्याची फलश्रृती आता होताना दिसत आहे.



आमदार लांडगे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली 2014 नंतरच्या काळात समाविष्ट गावांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी गती मिळाली. त्यामुळे 'चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर' विकसित झाला. परिणामी, वीज ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे महावितरण नवीन उपशाखा आणि मनुष्यबळ निर्मितीची आवश्यकता होती. भविष्यातील 25 ते 30 वर्षांचा विचार करुन नवीन शाखा निर्मिती करण्यात आली आहे. समाविष्ट गावांतील शाश्वात विकासावर या निमित्ताने शिक्कामोर्तब झाले आहे.

बोऱ्हाडेवाडी नवीन उपशाखेची निर्मिती...

भोसरी उपविभागीय २ कार्यालय अंतर्गत मोशी शाखेचे विभाजन करण्याच्या प्रस्तावालाही महावितरण प्रशासनाने मान्यता दिली आहे. नवनिर्मित बो-हाडेवाडी शाखेमध्ये कर्मचारी व अधिकारी संख्या वाढणार आहे. त्यामुळे त्यामुळे बो-हाडेवाडी, बारणेवस्ती, गायकवाडवस्ती, नागेश्वरनगर, बोराटेवस्ती, संजयगांधी नगर, बनकर वस्ती भागातील वीज पुरवठा सुरळीत व अखंड ठेवण्यास मदत झाली आहे. या नवीन शाखेअंतर्गत अंदाजे ३० हजार ग्राहक संख्या आणि पुर्वीच्या मोशी शाखेअंतर्गत अंदाजे २५ ते ३० इतकी ग्राहक संख्या आहे. त्यामुळे शाखा विभाजनाचा प्रस्ताव ठेवला होता. त्याला मान्यता मिळाली आहे.

> "शहराची वाढती लोकसंख्या आणि वीज ग्राहक यांचा विचार करता वीज पुरवठा यंत्रणा सक्षम करण्याची आवश्यकता आहे. वाढत्या वीज मागणीनुसार, वीज वितरण इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करण्यासाठी आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करीत आहोत. यापूर्वी इन्फ्रा-१ आणि इन्फ्रा-२ ची कामे सुरू झाली. त्यानंतर चऱ्होली शाखेचे विभाजन, भोसरी शाखेचे विभाजन आणि आता मोशी शाखेचे विभाजन करुन प्रशासन आणि यंत्रणेवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न आहे. मनुष्यबळ निर्मिती आणि RDSS योजनेतून निधीची उपलब्धता झाल्यामुळे वीज पुरवठा सक्षम करण्यास मदत होत आहे. प्रशासनाने आता मंजुर प्रस्तावानुसार कालबद्ध नियोजन करावे आणि कामाला सुरूवात करावी, अशी अपेक्षा आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# श्री संत सावता प्रतिष्ठाणतर्फे तिरूपती बालाजी मंदीराचा आकर्षक देखावा

**पिंपरी | प्रतिनीधी**

परिसरातील श्री संत सावता प्रतिष्ठाणतर्फे दरवर्षी आगळे-वेगळे अन् धार्मिक देखावे नवरात्रोत्सवानिमित्त साकारले जातात. रासगरबा यासोबतच देवीची स्थापना, मिरवणूक अन् देखावा हे या उत्साहाचे आकर्षण असते. मोशीकरांचा या उत्साहाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रतिष्ठाणचे हे यशस्वी अठरावे वर्षे आहे. यंदा तिरूपती बालाजी मंदिराचा आकर्षक देखाव्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.



मोशीतील अनंत सस्तेनगरमधील वैशाली स्वीटमार्टच्या मागील मैदानात रासगरबा अन् देवीची स्थापना करण्यात आली होती. श्री संत सावता प्रतिष्ठाणचे अध्यक्ष मंगेश तुकाराम हिंगणे यांच्यातर्फे उत्सवाचे आयोजन कऱण्यात आले होते.

आकर्षक विद्युत रोषणाई... फुलांच्या माळा... रांगोळ्या अन् आई जगदंबेचा जयघोष हे वैशिष्ट्य पहायला मिळाले. मोशीतील भारतमाता चौक ते अनंत सस्तेनगर कॉसमॉस बिल्डींगपर्यंत देवीची मिरवणूक काढण्यात आली. प्रतिष्ठाणच्या वतीने दरवर्षी विविध देखाव्यांचे सादरीकरण केले जाते. यंदा तिरूपती बालाजीच्या देखाव्याने सर्वांची मने बहरून टाकली.

रासगरबा अन् दांडियाला मोशीकरांनी तुफान गर्दी केली होती. रिमुक्स, बॉलीवुड अन् मराठी गाण्यांवर तरूणाईने गरबा अन् दांडियाची धमाल केली. ढोलीडा, गरबे की रात, उडी उडी जाये, चो गाडा तारा, पेथल पूरमा गाण्यांचा समावेश होता. रंगबिरंगी वेशभूषा शोभून दिसत होती.

प्रतिष्ठानच्या देवीच्या दर्शनासाठी अन् रासगरबातील तरूणाईला भेट देण्यासाठी भोसरी मतदार संघाचे आमदार महेश दादा लांडगे, पुणे गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त निखिलजी पिंगळे चिखली, जाधववाडी, मोशी परिसरातील युवानेते, उद्योजक यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते अन् मोशी ग्रामस्थांनी भेट दिली.

# वीर छत्रपती संभाजीराजे नवरात्रोत्सव मंडळाकडून सामाजिक बांधिलकी जपत पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात



**पिंपरी | प्रतिनीधी**

भोसरीतील वीर छत्रपती संभाजीराजे नवरात्र उत्सव मंडळ, यांच्यातर्फे यंदा शारदीय नवरात्र उत्सव दिमाखदार आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला . तसेच आपण ज्या समाजात राहतो, त्या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो. या भावनेने मंडळाच्या अध्यक्षा सौ. कविताताई भोंगाळे व उत्सव प्रमुख श्री. किरण फुगे यांनी आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी मंडळाच्या वतीने धान्य व ईतर संसारोपयोगी वस्तू मदत स्वरुपात देण्याचा निर्णय घेत सामाजिक बांधिलकी जपणारा अनोखा उपक्रम राबविला आहे. या उपक्रमाचे शहरातील सर्वच नागरिक कौतुक करत आहेत.

उत्सवाची सुरुवात पवित्र विधींसह घटस्थापनेने झाली. रोज सकाळी देवी पूजन, सप्तशती पठण, व संध्याकाळी आरत्या यामुळे संत तुकारामनगर भोसरी परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झालेले. संध्याकाळी परिसरातील नागरिकांच्या सहभागाने देवीच्या आरत्या, दांडिया-गरबा अशा कार्यक्रमांनी वातावरण अधिकच उत्साहवर्धक झाले होते. दांडिया स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्या सौ. वर्षाताई राठोड यांना मंडळाच्या अध्यक्षा सौ. कविताताई यांच्याकडून द्वितीय क्रमांकाच्या विजेत्या सौ. दीक्षा प्रकाश साळवी यांना पारितोषिकतृतीय क्रमांकाचे विजेत्या सौ. नेहा नागेश माडेकर यांना सन्मानित करण्यात आले. महिलांसाठी मंगलागौर, तर बालकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले.

नवरात्र उत्सव हा केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता समाजोपयोगी कार्याचा एक महत्त्वाचा सोहळा ठरावा, यासाठी मंडळातर्फे दरवर्षी रक्तदान शिबीर, मोफत आरोग्य तपासणी, वृक्षारोपण मोहीम, स्वच्छता अभियान ईत्यादी उपक्रम राबविण्यात येत असतात.

यंदा मंडळाची आरास आणि देवी सजावट विशेष आकर्षण ठरणार आहे. रंगीबेरंगी फुलांनी, विद्युत रोषणाईने सजवलेल्या मंडपामुळे परिसर चैतन्यमय झाला आहे.

# पुणे महापालिकेच्या प्रारुप प्रभागरचनेस अंतिम मान्यता...

## अंतिम प्रभागरचनेचे गॅझेट पब्लिकेशन सोमवारपर्यंत (दि. 6) प्रसिद्ध होणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिल्यानंतर गेल्या चार ते साडेचार वर्षांपासून रखडलेल्या निवडणुका होणार असल्याचे निश्चित झाले आहे. न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर राज्य सरकारने निवडणुका घेण्याचे जाहीर केले असून यासाठी प्रक्रिया राबविण्यास सुरुवात झाली आहे.



पहिल्या टप्प्यात जिल्हा परिषदेच्या तर त्यानंतर महानगरपालिकांच्या निवडणुका होणार असल्याची चर्चा आहे. त्या दृष्टीने गेल्या काही दिवसांपासून नियोजन देखील केले जात आहे. आगामी महापालिकेच्या निवडणुका या २०११ च्या जनगणनेनुसार घेतल्या जाणार आहेत. पुणे महानगरपालिकेच्या सभागृहाचे मुदत साडेतीन वर्षापूर्वी संपुष्टात आल्यानंतर महापालिकेचा कारभार चालवण्याची जबाबदारी राज्य सरकारने प्रशासकावर दिली आहे. महापालिका आयुक्त यांनाच प्रशासक म्हणून राज्य सरकारने नियुक्त केले असून त्यांच्या माध्यमातून सध्या महापालिकेचा कारभार सुरू आहे.

महापालिकेच्या रखडलेल्या निवडणुका घेण्यात याव्यात अशी मागणी वारंवार केली जात होती. मात्र त्यावर निर्णय होत नव्हता. मात्र न्यायालयाने दिलेल्या निकालानंतर निवडणुकीच्या कामाला काही प्रमाणात वेग आला आहे. पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठीच्या अंतिम प्रभागरचनेला राज्य निवडणूक आयोगाने मंजुरी दिली. प्राधिकृत अधिकारी यांच्या अहवालावर आधारित ही मान्यता देण्यात आली असून, अंतिम प्रभागरचनेची अधिसूचना (वॉर्ड गॅझेट) सोमवारपर्यंत प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर महापालिकेने तयार केलेल्या प्रभागरचनेमध्ये कोणते बदल झाले आहेत, हे स्पष्ट होणार आहे.

महापालिकेची आगामी निवडणूक चार सदस्यांच्या प्रभागपद्धतीनुसार होणार असून, एकूण १६५ नगरसेवक निवडले जाणार आहेत. महापालिकेने प्रारूप प्रभागरचना तयार करून प्रसिद्ध केल्यानंतर त्यावर ४ सप्टेंबरपर्यंत नागरिकांकडून हरकती-सूचना मागविण्यात आल्या होत्या. प्रारूप प्रभागरचनेवर सुमारे सहा हजार हरकती आल्या होत्या. यातील ८२८ नागरिकांनी सुनावणीस प्रत्यक्ष उपस्थित राहून हरकती नोंदविल्या.

वरिष्ठ सनदी अधिकारी व्ही. राधा यांना सुनावणीसाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमण्यात आले होते. हरकतींवर सुनावणी झाल्यानंतर आवश्यक ते बदल करून अंतिम रचना राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात आली होती. त्यास आयोगाची मान्यता मिळाल्याने आता पुढील निवडणूक प्रक्रियेला वेग येणार आहे.

महापालिकेचे निवडणूक अधिकारी प्रसाद काटकर यांनी ही माहिती दिली.अंतिम प्रभागरचनेचे गॅझेट पब्लिकेशन सोमवारपर्यंत प्रसिद्ध होणार आहे. हरकतींची सुनावणी झाल्यानंतर आवश्यक ते बदल करून अंतिम रचना राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात आली होती. त्यास आयोगाची मान्यता मिळाली आहे. त्यामुळे यापुढील निवडणूक प्रक्रियेला वेग येणार आहे.

प्रारूप आराखड्यावर आलेल्या हरकती व सुनावणीनंतर शासनाने त्यात सुमारे १४ ते १५ बदल केल्याची चर्चा आहे. यामध्ये ६ ते ७ प्रभागांच्या नावांमध्ये सुधारणा, तर ८ ते १० प्रभागांच्या हद्दींमध्ये बदल केले असून, उपनगरांतील काही प्रभागांच्या हद्दींमध्येच मुख्य बदल केल्याचे बोलले जात आहे. मात्र, प्रभागरचनेची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर प्रभागांचे अधिकृत स्वरूप स्पष्ट होईल.

# कोजागरीसाठी पुण्यातील उद्याने रात्री बारापर्यंत सुरु

## कोजागरी पौर्णिमेनिमित्त सोमवारी शहरातील महापालिकेची सर्व उद्याने सकाळी 6 ते रात्री 12 वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुली ठेवली जाणार आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

कोजागिरी पौर्णिमेचा आनंद यंदाच्या वर्षी पुणेकरांना चांदण्यांच्या साक्षीने घेता येणार आहे. नागरिकांना खुल्या वातावरणात उत्सवाचा आनंद घेता यावा, यासाठी पुणे महापालिकेने मोठा निर्णय घेतला आहे. शहरातील प्रमुख उद्याने व बागा या खास दिवशी उशिरापर्यंत नागरिकांसाठी खुली ठेवण्यात येणार आहेत.

कोजागरी पौर्णिमेनिमित्त सोमवारी (६ ऑक्टोबर) शहरातील महापालिकेची सर्व उद्याने सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुली ठेवली जाणार आहेत. उद्यान विभागाने हा निर्णय घेतला आहे. महापालिकेच्या उद्यान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कोजागिरी पौर्णिमेला नेहमीप्रमाणे हजारो नागरिक आपल्या कुटुंबियांसह रात्री उशिरापर्यंत फिरण्यासाठी, गप्पा मारण्यासाठी आणि पारंपरिक दूधपानाचा कार्यक्रम करण्यासाठी उद्यानात येतात.



### संपूर्ण शहरात तयारी

» सिंहगड रोड, कोथरूड, शिवाजीनगर, नगररोड, पिंपळे सौदागर आदी भागातील महत्त्वाची उद्याने उघडी राहतील. तसेच प्रत्येक उद्यानात अतिरिक्त लाईट्स, पाणी व साफसफाईची सोय करण्यात आली आहे. कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने पुणेकरांना चांदण्यांचा आस्वाद घेत कुटुंबासह आनंद लुटण्याची एक आगळीवेगळी संधी मिळणार आहे.

या पार्श्वभूमीवर सुरक्षाव्यवस्था, प्रकाशयोजना व स्वच्छतेची विशेष खबरदारी घेण्यात आली आहे.

पुणे महापालिकेची शहरातील विविध भागांत २१६ उद्याने, एक मत्स्यालय व एक प्राणी संग्रहालय आहे. या ठिकाणी पुणेकर, तसेच परदेशी नागरिक व लहान मुले भेटी देत असतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६६ (१०) नुसार, नागरिकांच्या मनोरंजनासाठी उद्याने व बागांची उपलब्धता करणे महापालिकेचे कर्तव्य आहे.

कोजागरी पौर्णिमा हा चांदण्याच्या रात्रीचा उत्सव मानला जातो. पारंपरिक पद्धतीने नागरिक रात्रीच्या चंद्रप्रकाशात कुटुंबीय, तसेच मित्रपरिवारासोबत एकत्र येतात. पुणेकरांना कोजागरीचा आनंद शहरातील उद्यानांत अनुभवता यावा, यासाठी महापालिकेने ही विशेष सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

### नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

» कोजागिरी पौर्णिमा ही केवळ धार्मिक किंवा पारंपरिक सण नसून सामाजिक एकोप्याचेही प्रतीक आहे. चांदण्यात फेरफटका, हास्यविनोद, सांस्कृतिक कार्यक्रम, गाणी-गप्पा यामुळे उद्यानांत उत्सवी वातावरण निर्माण होते. त्यामुळे उद्याने रात्री उशिरापर्यंत उघडी ठेवण्याच्या निर्णयाचे नागरिकांनी स्वागत केले आहे.

### प्रशासनाने केले आवाहन

» उद्याने सुरू ठेवताना शिस्त, स्वच्छता व शांततेचे पालन करण्याचे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे. कोणत्याही प्रकारचा गोंधळ, मोठा आवाज किंवा अस्वच्छता निर्माण होऊ नये यासाठी प्रशासन व पोलिसांकडून संयुक्त देखरेख ठेवण्यात येणार आहे.

# आरक्षणाची अंतिम इनिंग! 13 ऑक्टोबरपर्यंत इच्छुकांची घालमेल

## पुणे जिल्हा परिषद आणि जिल्ह्यातील 13 पंचायत समित्यांची अंतिम प्रभाग रचना नुकतीच जाहीर झाली आहे




**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा परिषद आणि जिल्ह्यातील 13 पंचायत समित्यांची अंतिम प्रभाग रचना नुकतीच जाहीर झाली आहे. 13 ऑक्टोबरपर्यंत आरक्षण निश्चित होणार आहे, ज्यामुळे इच्छुक उमेदवारांची गती आणि तयारी आता चरमावस्थेत पोहोचली आहे. गाठीभेटी, बैठका आणि रणनीती आखणीच्या हालचाली सर्वत्र सुरू आहेत; मात्र आरक्षणाची अंतिम प्रतीक्षा असल्यामुळे अनेकांनी पूर्ण ताकदीने मैदानात उतरलेले नाहीत.गटातील दिग्गज नेतेमंडळींपासून पहिल्यांदाच राजकारणात उतरलेल्या उमेदवारांपर्यंत सर्वच हालचाली वेगाने सुरू आहेत.

जिल्हा परिषद सदस्य होण्यासाठी इच्छुक उमेदवार गावोगावी नातेवाईक, मित्र व कार्यकर्त्यांच्या बैठका घेऊन स्थानिक मतदार संघटन बळकट करत आहेत. अनेक उमेदवारांनी स्वतःसोबत कुटुंबातील सदस्यांना देखील सक्रिय केले आहे, जेणेकरून गट आरक्षित राहिल्यास घरातील सदस्यांमार्फत निवडणूक लढवता येईल.पूर्व हवेलीतील लोणी काळभोर, कदमवाकवस्ती, उरळी कांचन या भागातील इच्छुक उमेदवारांवर आरक्षणाची अनिश्चितता टांगती तलवार आहे.

गट आरक्षित झाल्यास आधीचा खर्च वाया जाईल, ही भीती काहींनी सुरुवात सावधगिरीने करण्यास भाग पाडली आहे. तथापि, सर्वसाधारण वातावरण निवडणुकीच्या रणधुमाळीकडे झुकलेले दिसते, गावोगावी चर्चा सुरू आहेत आणि मतदार आपापल्या प्रभागातील समीकरणांचा अंदाज घेत आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्ष एकत्र लढवतील की स्वतंत्र, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. त्यामुळे काही उमेदवार स्वतंत्रपणे मैदानात उतरले आहेत.

अनेक तरुण उमेदवार आपल्या संधीसाठी तयारी करत आहेत; कुठल्या ना कुठल्या पक्षाकडून संधी मिळेल, या हेतूने सध्या बॅनरबाजीही सुरू आहे.शहरालगत हवेली तालुक्यात नागरीकरणाचे प्रश्न उभे आहेत. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरावस्था आणि वाढत्या शहरीकरणामुळे नागरिकांवर येणारा ताण ही प्रमुख अडचण आहे. मोठ्या ग्रामपंचायती असूनही नागरी सुविधा पुरवण्यात अपयश, आर्थिक स्थिती, नियोजन आणि योग्य नेतृत्वाचा अभाव या समस्यांची कारणे आहेत. विकासाचे नियोजन न केल्यामुळे अनेक समस्या वर्षानुवर्षे उरल्या आहेत. नव्याने निवडून येणाऱ्या प्रतिनिधींनी या समस्यांकडे त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे.

13 ऑक्टोबरपर्यंत आरक्षण निश्चित होणार आहे, ज्यामुळे इच्छुक उमेदवारांची गती आणि तयारी आता चरमावस्थेत पोहोचली आहे. गाठीभेटी, बैठका आणि रणनीती आखणीच्या हालचाली सर्वत्र सुरू आहेत; मात्र आरक्षणाची अंतिम प्रतीक्षा असल्यामुळे अनेकांनी पूर्ण ताकदीने मैदानात उतरलेले नाहीत.गटातील दिग्गज नेतेमंडळींपासून पहिल्यांदाच राजकारणात उतरलेल्या उमेदवारांपर्यंत सर्वच हालचाली वेगाने सुरू आहेत.

### या गटांत आरक्षण पडणार?

» राज्य सरकारच्या नवीन आरक्षण आदेशानुसार पुणे जिल्हा परिषदेत सात गट अनुसूचित जातीसाठी आरक्षित होण्याची शक्यता आहे. हवेली तालुक्यातील उरुळी कांचन, लोणी काळभोर, गुणवडी, नीरा वागज (ता. बारामती), गोपाळवाडी (ता. दौंड), लासुर्णे, वालचंदनगर (ता. इंदापूर) या सात गटात अनुसूचित जातीचे आरक्षण येऊ शकते. शिनोली (ता. आंबेगाव), बारव, डिंगोरे (ता. जुन्नर), वाडा (ता. खेड) आणि टाकवे बुद्रुक (ता. मावळ) या पाच गटात अनुसूचित जमातीचे आरक्षण येण्याची शक्यता आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतरच इच्छुक उमेदवार मैदानात उतरतील, आणि निवडणूक रंगणार आहे.

# मुळा-मुठा, भीमेवरील बंधारे होणार आता स्वयंचलित बॅरेजेस

## जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली निर्णय; उजनी बॅकवॉटरमध्ये नव्या बॅरेजेससाठीही मंजुरीची प्रक्रिया सुरु

**पुणे | प्रतिनिधी**

मुळा-मुठा आणि भीमा नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे स्वयंचलित बॅरेजेसमध्ये रूपांतर करण्याचा व उजनी धरणाच्या बॅकवॉटर क्षेत्रात नवीन बॅरेजेस बांधण्याचा निर्णय राज्याच्या जलसंपदा विभागाच्या महत्त्वपूर्ण बैठकीत घेण्यात आला. दौंड विधानसभा मतदार संघाचे आमदार राहुल कुल यांनी ही माहिती दिली.

मुंबईत झालेल्या बैठकीत जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सिंचन व्यवस्थेतील सुधारणा, शेतकऱ्यांच्या पाणी समस्या, चिबड जमिनीचे निर्मूलन आणि नदीवरील बंधाऱ्यांचे आधुनिकीकरण यावर सविस्तर चर्चा झाली.

मुळशी व कोयना प्रकल्पांमुळे पूर्वेकडे जाणारे नैसर्गिक नद्यांचे पाणी पश्चिमेकडील कृष्णा खोऱ्याकडे वळविले जाते. परंतु पूर्वेकडील भागात पाण्याची टंचाई असल्यामुळे अंदाजे 9 टीएमसी पाणी तुटीच्या खोऱ्याकडे वळविण्याबाबत अभ्यास करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. याचा उपयोग शेतकऱ्यांच्या सिंचनासाठी होणार असून व्यवहार्यता अभ्यास पुणे पाटबंधारे मंडळाच्या अधीक्षक अभियंत्यांकडे सोपविण्यात आला आहे.

दौंड तालुक्यातील उजनी धरणाच्या बॅकवॉटर क्षेत्रात बॅरेजेस बांधण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केला असून, मंजुरीनंतर कार्यवाही सुरु होणार आहे. या बॅरेजेसमुळे स्थानिक शेतकऱ्यांना अधिक चांगली सिंचन सुविधा उपलब्ध होणार आहे. राहू येथील बंधाऱ्याचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. उर्वरित दहिटणे, पारगाव, सादलगाव, कानगाव, सोनवडी, देऊळगाव राजे, पेडगाव व खोरवडी येथील बंधाऱ्यांचे प्रस्ताव पुढील महिन्यात सादर केले जातील. तर दौंडसह राज्यातील चिबड व पाणथळ जमिनींची समस्या दूर करण्यासाठी पाझरचर व बंदिस्त पाझरचर धोरण निश्चित करण्याचेही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.



### कुपटेवाडीसाठी नवीन पाइपलाइन

» पुरंदर उपसा सिंचन योजनेतील कुपटेवाडी येथील वंचित भागासाठी नवीन पाइपलाइन उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. कुपटेवाडी फाटा याचे नाव भुलेश्वर फाटा करण्यात आले. जनाई-शिरसाई उपसा योजनेतील कालव्यांचे रूपांतर बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये करण्यासाठी तब्बल 429.86 कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.